# नारीशक्ती वर समाज आणि विश्व उत्थानाची जबाबदारी

फार पर्वी पासून समाजात असे बोलत चालले आहे की नारी शारीरिक रीतीने दूर्बळ,अबला आहे.हे पण सांगत आलेले आहेत की नारी ची बुद्धि छोटी आहे किंवा तीच्यात निर्णय करण्याची शक्ती,समझण्याची शक्ती,विचार करण्याची शक्ती नाही.नारीच्या विरुद्ध हा सुद्धा आरोप लावलेला आहे की बौद्धिक रुपाने नारी पुरुषाचे बरोबरी करू शकत नाही.नारीच्या विरूद्ध दूसरा असा आरोप हा ही पुरुषाने लावला की पुरूषा पेक्षा नारी अधीक भाऊक व वासना प्रधान आहे.एवढेच नव्हे तर काही शास्त्रात नारीला नर्काचे द्वार म्हटले गेलेले आहे. संत कबीरांनी तर नारीची कसरच सोडली नाही. त्यांनी सांगीतले - नारी नसावै तीन गुन,जो नरपासे होय। भक्ति,मुक्ति,जिन ध्यान में,पैठि न सक्के कोय।। वास्तविकता तर काम विकार स्त्री मध्ये असो की पुरुषात असो ते भक्ति व ध्यानात बाधक आहे. परंतु कबीरांनी तर मुख्यत: नारीलाच दोषी ठरवीले.खरे तर हे आहे आपला स्वत:चा बघण्याचा दृष्टिकोन कसा आहे ? त्याचावर अवलंबुन आहे. आधुनिक शरीर विज्ञान आणि मनोविज्ञानाने प्रत्यक्ष उदाहरणाने सिद्ध केलेले आहे की हजारों वर्षांपासून चालत आलेले वरील चार ही आरोप एक तर शारीरिक,बौद्धिक,भावनात्मक व चारित्रिक मान्यता निराधार आहे व सरासर खोटे आहेत.

परिवार समाजाची सर्वात मोठी एकता आहे. परिवाराची एकता,त्याची आंतरीक रीति-नीति,सामाजीक व्यवहार व त्यांची जीवन पद्धती व त्या परिवाराची संस्कृति,सभ्यता प्रथम मातृशक्ति वर अवलंबून असते. असे वाटते की परमपिता परमात्मा ने समस्त विश्वा मध्ये मातृ शक्तिलाच हे कार्य सोपवून पृथ्वी वर पाठवलेले आहे. ती आपल्या श्रमशक्तिने,सेवाभावना,निष्ठा आणी सहिस्णुतताने परिवारातील लोकांमध्ये चरित्राचे उदात्त गुणांचे बीजारोपण व आपली अलौकीक स्नेहाची शीतल छाया व दिव्य गुणांच्या विकास करण्याचा परिवारातील सदस्यांना वेळ देईल तर खरोखरच भारत देश महान देश होईल व भारत माताचा जयजयकार होईल.

मातृशक्ति आणि मातृजातींनी आपली अंतर मनाची दृढ निष्ठा आणि संकल्प शक्तिने ज्या ज्या ठीकाणी स्थापना केली व परिवारा मध्ये त्यांच्या व्यावहारीक रुपाने समावेष केला त्या त्या ठिकाणी त्या परिवाराचे लहान-मोठया लोकांमध्ये श्रेष्ठ गुणांचे निरंतर विकास झाला आहे. इतिहास हया सत्यात साक्षी आहे. विश्वामध्ये महान ते महान चारित्र्यवान व्यक्ती चे चरीत्र घडविणारी व्यक्ति असेल तर ती त्या घराची नारीच असेल.छत्रपती

शिवाजी महाराज असो किंवा श्री. लालबहादूर शास्त्री,महात्मा ध्रुव असो, श्री. लाला लाजपत राय असो हया सर्वांचे चरित्र त्यांच्या मातेचा चरित्राची दृढता,निष्ठा,संकल्प आणि लक्ष्य-सिद्धी चे संस्कारांनी महान उपलब्धीचा दिशेने प्रेरीत केले होते.

**मातृजाती चे विशेष गुण**

मातृशक्ति सेवाभाव चे जीवंत प्रतीमा आहे.तिचा ममतेला कधीच अंत नाही.नारी जवळ सर्वांचे कल्याणाची ईच्छा आहे,ती कोणाचा अहित विचार करीत नाही.आपल्या व्यक्तिगत सुख आणि स्वार्थाची भावनाचे त्याग करून संपुर्ण परिवाराचे मंगल आणि हितासाठी नि:स्वार्थ भावनेने समर्पित आहे अश्या माताचे चरित्र - सर्वजनहिताय एक आदर्श चरीत्र आहे.जर कधी परिवाराची कोण्या माताची संस्कृती अर्थात तीची जीवन पद्धतीमध्ये ध्यान,साधना आणि अभ्यासामध्ये जास्त विकसीत किंवा परिष्कृत केले तर मातेचे प्रभाव त्या परिवारात श्रेष्ठ गुणांची व उच्च कोटी चे चरीत्राचे निर्माण करण्यासाठी वेळ लागणार नाही. कोण्या एका व्यक्तिने सांगीतले आहे हे मणुष्य! जर तुझे धन गेले तर समजावे की तुझे काहीच गेले नाही,जर कधी तुझे स्वास्थ्य गेले तर समज की थोड़े काही तरी गेले आणि जर तुझे चरित्र नष्ट झाले तर समजून घे की तुझे सर्वच काही गेले.

कोण्या परिवारामध्ये माता जर निर्भय होऊन आपल्या सवयींवर अनुशासन,श्रमशीलता,नियमितता आणि पवित्रता हया दिव्यगुणांना जीवनांत उतरवेल तर त्या वातावरणाचा प्रभाव व हे संस्कार त्या परिवारात छोटया-मोठयांमध्ये अंकुरीत आणि विकसीत होण्याकरीता वेळ लागणार नाही. आपला भारत देश महान त्या निमित्तानेच आहे की आपण सर्वज भारत देशाला भारत माता की जय म्हणतो आणि वंदेमातरमचे गीत म्हणतो.म्हणूनच काही ग्रंथात सांगितले आहे की - यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता.ज्या कुळात स्त्रियांच्या सन्मान,पूजन होते त्या ठिकाणी  देवता नांदतात. प्राचीण भारतात देखील आगोदर श्री लक्ष्मी नंतर श्री नारायण म्हटले गेले आहे.

आजचा या शुभ दिवशी अत्यंत आनंद होत आहे की महिला सशक्तिकरणाचे कार्य प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय गेल्या ७०वर्षापासून अत्यंत प्रभावशाली रितिने करीत आहे. ब्रह्माकुमारी संस्था संपुर्ण विश्वव्यापी संस्था असून देश विदेशात याचे १०० देशात ७०००पेक्षा अधिक शाखा आहेत.आणि त्यांची मुख्य संचालीका महिला आहे व त्या आदरणीय दादी प्रकाशमणी जी आहे. आज त्यांचे वय ८६ वर्ष आहे तरी देखील त्यांचे हे अद्भूत कार्य अनुकरणीय आहे.संस्थेच्या सह मुख्य प्रशासिका दादी जानकी जी आहेत त्यांचे वय ९० वर्ष आहे व ते देखील मानव कल्याणाकरीता देश विदेशात भ्रमण करीत असतात.आज त्यांचे वय ९० वर्ष

असले तरी एका युवा व्यक्ति ला लाजवण्यासारखे कार्य करीत आहे.मी प्रत्यक्ष माझ्या डोळयांनी पाहिले आहे की दादी जानकी स्टेज वर जातात तर एकटयाच पायर्या चढतात व माऊंट आबू मध्ये ज्ञानसरोवरचा प्रांगणात पण पाहिले जसे कोणी युवा चालत आहे. या संस्थेच्या विश्वास आहे की नर आणि नारी गृहस्थ जीवनरुपी रथाची दोन चाके आहेत जर दोन्हीं ही दिव्यताचा मार्ग जीवनात उतरवतील तर अति उत्तम होईल. पारस्पिरिक अगाध स्नेहाची भावना आणि सम्मानाची भावना तर हवीच परंतु आसूरी वृत्ती,शोषण व एक दुसर्यांसाठी वासनाची भावना नको असायला पाहिजे. आध्यात्मिक ज्ञानाच्या आधारे नारी व नराचे हे कार्य बघण्यायोग्य आहे.याच्या उद्देश्य सामाजिक मूल्यांची स्थापना करणे आणि नारी पासून श्री लक्ष्मी समान व नरापासून श्री नारायणा समान देवी देवता बनविणे होय.नारी कधी व्यक्तिगत स्वार्थ बघत नहीं निष्काम भावनेने सेवा करत रहाते.

- ब्रह्माकुमारीज् वार्ता फिचर्स

www.bkvarta.com